# सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून सीमेवरील सैनिक बांधवांसाठी राख्या




सीमेवरील जवानांना विद्यार्थी विद्यार्थिनींच्याकडून राख्या जमा करताना संस्था सचिव शिवाजीराव पाटील व प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील समवेत डॉ.बी. एन.रावण,डॉ.एस.एस.कुरलीकर, डॉ.उमा पाटील,डॉ.मनीषा पाटील,प्रा.पी.डी.माने व मान्यवर

देशाच्या सीमेवर असणारे सैनिक बांधव रक्षाबंधन ,दिवाळी,दसरा सण साजरे करू शकत नाहीत कारण ते कुटुंबासमवेत नसतात तर ते सीमेवर जनतेच्या संरक्षणासाठी उभे असतात त्यांच्या प्रति आदर ,ममत्व, आत्मियता आणि भावनिकता या दृष्टिकोनातून महाविद्यालया मार्फत राख्या पाठवण्यात येत आहेत असे प्रतिपादन इतिहास विभाग प्रमुख डॉ. उमा पाटील यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज ,माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व सहेली व्यक्तिमत्व विकास समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक बांधिलकीच्या दृष्टिकोनातून सीमेवरील सैनिक बांधवांसाठी विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या कडून राख्या जमा करण्यात आल्या त्यावेळी डॉ.उमा पाटील बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील होते.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील , अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ.बी.एन.रावण,सहसमन्वक डॉ. एस.एस.कुरलीकर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ.मनीषा पाटील यांनी केले तर आभार प्रा.पी.डी.माने यांनी मानले.

कार्यक्रमास सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक,प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.